**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक : १३/०७/२०२४**

**लोकसेवक बालाजी उत्तरवार, दुय्यम निबंधक, हदगांव यांनी मुद्रांक विक्रेता समीउल्ला शेख व अबूबकर करीम शेख यांच्या मार्फतीने रजिस्ट्री करण्यासाठी ८१,६००/— रुपयांची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | पो.स्टे हदगांव जि.नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं १८१/२०२४ कलम ७,७ अ, १२ भ्र.प्र.अ. १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक १३.०७.२०२४ रोजी ०५.१० वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १. बालाजी शंकरराव उत्तरवार, दुय्यम निबंधक श्रेणी १, उप—निबंधक कार्यालय, हदगाव (वर्ग ३),<br>२. समीउल्ला अजमतउल्ला शेख उर्फ शमी (मुद्रांक विक्रेता/खाजगी इसम)<br>३. शेख अबूबकर करीम सिद्दिकी उर्फ बाबू (मुद्रांक विक्रेता/खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,९९,०००/—— मुद्रांक फिस सह |
| लाच स्विकारली रक्कम | तडजोडी अंती १,९५,०००/— ( १,१३,४००/— रू. नोंदणी व मुद्रांक ची पावती व ८१,६००/— रूपये ) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी मौ. हदगाव येथील गट क्रमांक २५६/२ मध्ये २० गुंठे शेतजमीन खरेदी केली होती. दि. ०८/०७/२०२४ रोजी तक्रारदार नमुद शेत जमीनीच्या रजिस्ट्री करिता उप निबंधक कार्यालय, हदगाव येथे जावून लोकसेवक उत्तरवार, दुय्यम निबंधक यांना भेटले असता त्यांनी रजिस्ट्री करण्यासाठी १,९९,०००/— रु. नोंदणी व मुद्रांक फी सह लाचेची मागणी केली. नमुद शेतीचे रजिस्ट्री करिता लोकसेवक मागत असलेले १,९९,०००/— रु. नोंदणी व मुद्रांक फी व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्याचे तक्रारदार यांची खात्री झाली व त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दि. १२/०७/२०२४ रोजी याबाबत तक्रार दिली.<br>नमुद तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडकडून लाच मागणीची पडताळणी केली असता, आलोसे क्र. १) बालाजी उत्तरवार यांनी तक्रारदार यांना नमुद शेतीच्या रजिस्ट्री करिता नोंदणी व मुद्रांक फी सह असे म्हणून पंचासमक्ष १,९९,०००/— रूपयाची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी नमुद रक्कम कमी करण्यास विनंती केली असता लोकसेवक यांनी ४,०००/— रु. कमी द्या, असे म्हणून तडजोडी अंती १,९५,०००/— रु. लाचेची मागणी करून लाच रक्कम आरोपी क्र. २) समीउल्ला अजमतउल्ला शेख याचेकडे देण्यास सांगितले.<br>त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र. २) समीउल्ला यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम १,९५,०००/— रु. उप निबंधक कार्यालय, हदगाव चे आवारात स्विकारून नमुद रक्कम आरोपी क्र. ३) शेख अबुबकर याचेजवळ दिली. त्यानंतर तक्रारदार यांना नोंदणी व मुद्रांक फिस भरल्याची १,१३,४००/— रु. ची पावती दिली आहे. नमुद प्रकरणात लोकसेवक उत्तरवार यांनी नोंदणी व मुद्रांक फीचे नावाखाली तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ८१,६००/— रु. लाचेची मागणी करून नमुद रक्कम आरोपी क्र. २) समीउल्ला यांचेद्वारे स्विकारली. नमुद लाच रक्कम आरोपी क्रमांक ३) यांनी स्वतःचे ताब्यात ठेवून गुन्हयास प्रोत्साहन दिले आहे. आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन हदगाव, जि.नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| मार्गदर्शक | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती प्रिती जाधव, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
| संपर्क कमांक :— 02462—253512<br>टोल फ्री कमांक— 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई—मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई—मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner